प्रसिद्धीपत्रक

छत्रपति संभाजी बाग येथे पुणे मेट्रोचे माहिती केंद्र

दि. ८ जुलै २०१८, पुणे.

पुणे महा मेट्रोचे काम संपूर्ण शहरात सुरू झालेले आहे. या महा मेट्रोकडून आत्ता एक नवीन योजना राबविण्यात येणार आहे. ही बाब पुण्यातील नागरिकांना वापरण्यास सोपी अशी आहे. बालगंधर्व रंगमंदिराच्या शेजारी असलेल्या छत्रपति संभाजी पार्क येथे महा मेट्रो, पुणे हे माहिती केंद्र सुरू करीत आहे. या केंद्रामुळे नागरिकांना किंवा समाजाला मेट्रोबाबत योग्य व आवश्यक माहिती देण्यास सहकार्य होईल.

या केंद्रामधून मेट्रोची हुबेहूब प्रतिकृती, प्रवाशांकरिता असलेले कोच, त्याच्या आतील बाजूस असलेल्या संपूर्ण रचनेबाबत माहिती या केंद्राकडून देण्यात येईल. नागरिकांना मेट्रोचा अनुभव येण्याकरिता या केंद्राचा उपयोग होणार आहे. पूर्ण वेळ व समर्पित मनोवृत्तीचे कामगार या केंद्रात नागरिकांच्या सेवेकरिता नेमण्यात येतील व त्यामुळे नागरिकांना मेट्रोच्या योजनेबाबत संपूर्ण माहिती वारंवार मिळेल.

नागरिक आपल्या शंका किंवा सूचना असतील तर या केंद्राला भेट देऊ शकतात. या केंद्रामुळे नागरिकांना सध्याच्या मेट्रोच्या कामाच्या प्रगतीबाबत, योजनेतील अद्ययावत माहिती, ठळक मुद्दे, स्थानके, मार्ग, फायदे इत्यादींबाबत सविस्तर माहिती उपलब्ध होणार आहे. हे केंद्र संपूर्ण दिवस म्हणजे सकाळी ७ ते रात्री ११ पर्यंत नागरिकांकरिता उघडे राहणार आहे.

मेट्रोच्या मॉडेलचे बाह्यरूप कसे असेल, त्याकरिता वापरले जाणारे साहित्य म्हणजे एफआरपी व एसीपी, ज्यामुळे कोच हे स्टीलने बनविलेल्यासारखे दिसतील, ग्लास आणि पीव्हीसी मॅटिंग कसे असेल याबाबत माहिती उपलब्ध करून देण्यात येईल. या केंद्रामध्ये इलेक्ट्रॉनिक सिस्टिमसुद्धा ठेवण्यात येणार असून ती नागरिकांना वापरूनसुद्धा पाहता येईल आणि त्यांना पाहिजे ती माहितीसुद्धा पाहता येईल.

एकूण आतील बाजूस ३ इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले ठेवण्यात येणार आहेत, ज्यामुळे नागरिकांना संपूर्ण योजना पीपीटीद्वारे दिसेल व माहितीपटही दिसेल. प्रत्येक कोचचे ग्राफिक्ससुद्धा विशेषकरून डिझाईन करण्यात आलेले असून पुण्याची वैशिष्ट्ये त्यात दाखविण्यात येणार असून सर्व चलनवलन आणि बांधणी या पीपीटीद्वारे दाखविण्यात येणार आहे.

प्रवाशांची क्षमतासुद्धा मेट्रोमध्ये वाढविण्यात आलेली आहे, मेट्रोच्या सिस्टिममध्ये रेखांशांचे समायोजन करून बसण्याची जागा ही योग्य रीतीने वापरण्यात आलेली आहे, त्यामुळे उरलेली जागा ही उभे राहून प्रवास करणाऱ्याना वापरता येते. त्यामुळे सर्व योग्य ते साहित्य जोडण्यात आलेले आहे, की त्यामुळे असलेल्या चौकटीमधील जास्तीत जास्त जागा वापरण्यात येणार आहे. आणीबाणीच्या प्रसंगांमध्ये प्रवाशांना सोप्यापद्धतीने प्रवास करता यावा, गर्दीच्या वेळेत प्रवास करणे सोपे व्हावे, उभे राहून प्रवास करताना सुद्धा त्रास होऊ नये म्हणून आरामदायक होईल असे डिझाईन केलेले आहे. नागरिकांना उपलब्ध करून दिलेल्या मॉडेलमध्ये या सर्व गोष्टी पाहता येतील.

शैक्षणिक संस्थांना आणि नागरिकांच्या मंचांना (समूहांना) प्राथमिक माहितीसुद्धा या योजनेमध्ये उपलब्ध करून दिलेली आहे. आजपर्यंतच्या अनुभवानुसार नागरिकांशी संवाद साधण्याच्या कार्यक्रमांमध्ये असे लक्षात आले की, नागरिक या चालू योजनेबद्दल माहिती करून घेण्यास फारच उत्सुक आहेत, असे पुण्यातील चित्र असे म्हणता येईल.

रेल्वेच्या डब्यांची वैशिष्ट्ये असलेली आर्टवर्क्समधून दाखविण्यात येणार आहेत. ही अॅक्रेलिक शीट्समध्ये असतील. कोचच्या भिंतीची चित्रेही दाखविण्याचे नियोजनही करण्यात आलेले आहे. मेट्रोतील कोचबाबतची ठळक व सविस्तर वैशिष्ट्ये यात दाखविण्यात येणार आहेत.

या केंद्राचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे हे मॉडेल वाहन चालविण्याच्या चित्रणासह दाखविण्यात येणार आहे. जेणे करून नागरिकांना कोचच्या आतील बाजूचे चित्रण योग्यरीतीने दिसेल आणि त्याचे नियंत्रण कसे ठेवले जाते, हे सुद्धा दाखविण्यात येणार आहे.

प्रत्यक्षात कोचमध्ये दोन हवानियंत्रक बसविण्यात आलेली आहेत, त्यामुळे थंडपणा किंवा उष्णतासुद्धा गरजेप्रमाणे आटोक्यात ठेवण्यात सुलभ होईल. कोचच्या आतील बाजून जिथे प्रवासी बसणार आहेत, त्या ठिकाणचे वातावरण आपोआपच नियंत्रणात ठेवण्यात येईल व उष्णतामान २५ डिग्री व ६५ टक्के आर्द्रता पूर्ण क्षमतेने नेहमी सांभाळता येईल.

पुण्याची वैशिष्ट्ये दिसण्याकरिता विशेषकरून हे ग्राफिक्स कोचमध्ये दाखविण्यात आलेले आहे. त्यामुळे पुणे शहरातील चलनवलन व शहराची रचना चित्तवेधकरीत्या दाखविण्यात येतील. या केंद्राचा मुख्य प्रवेशद्वार हे बालगंधर्व रंगमंदिराच्या बाजूने छत्रपति संभाजी उद्यानात आहे. संपूर्ण माहिती देणारी गॅलरीसुद्धा याच परिसरामध्ये ठेवण्याते नियोजन केलेले आहे, जेणेकरून नागरिकांना संपूर्ण योजनेही माहिती व वैशिष्ट्येही समजतील.

पुणे मेट्रोच्या या अभूतपूर्व योजनेमध्ये नागरिकांचाही सहभाग अपेक्षित आहे. प्रामाणिक पुनरावलोकन आणि सुयोग्य सल्ले, हे महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन गांभीर्याने अपेक्षा करीत आहे. त्यामुळे हे सर्व नागरिकांना परिपूर्ण माहिती देण्याकरिता व जास्तीत जास्त नागरिकांना याची संपूर्ण माहिती पोहोचवण्याकरिता हे केंद्र सुरू करण्यात आलेले आहे.